| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २७१ वा | सोमवार दिनांक १२ जानेवारी, २०२६ | पृष्ठ ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### जिल्ह्याज अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- ढोकी ठाणे अंतर्गत सुनिल रा. कोंड ता.जि. धाराशिव हे दि.०९.०१.२०२६ रोजी कोंड गावात जाणारे शिवसेना कमानी जवळ अंदाजे १,३५० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २७ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

उमरगा ठाणे अंतर्गत लक्ष्मण रा. बेडगा ता.उमरगा जि. धाराशिव हे दि.०९.०१.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर अंबुबाई रा. कवठा ता. उमरगा जि. धाराशिव या दि.०९.०१.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,८०० किंमतीची २८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

नळदुर्ग ठाणे अंतर्गत लक्ष्मीबाई रा. आरळी खु ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.०९.०१.२०२६ रोजी आरळी खु येथे आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ६,२०० किंमतीची ६० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर लक्ष्मण , रा. चिवरी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.०९.०१.२०२६ रोजी १८.२५ वा. सु. चिवरी महालक्ष्मी मंदीराचे शेजारी चिवरी शिवार अंदाजे ८,५५० किंमतीची ९५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

कळंब ठाणे अंतर्गत रेश्मा रा. भोगजी ता.कळंब जि. धाराशिव या दि.०९.०१.२०२६ रोजी भोगजी चौफुला येथे अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०९ जानेवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २७१ कारवाया करुन २,१९,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

### धाराशिव येथे जनजागृती कार्यक्रमात कायदा, पर्यावरण व शिक्षणावर भर

# बालविवाहमुक्त भारतासाठी विद्यार्थ्यांनी संकल्प करावा-न्या. भाग्यश्री पाटील



धाराशिव, (जिमाका)- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद व छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने 'बालविवाह मुक्त भारत - आपला संकल्प अभियान',पर्यावरण आणि सामुदायिक संरक्षण उपक्रमाविषयी जनजागृती कार्यक्रम छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,धाराशिव येथे आयोजित करण्यात आला.हा कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.भाग्यश्री पाटील यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार करून पुढे जावे,विजयाने उथळ वागू नये आणि पराभवामुळे खचून जाऊ नये.आदर्श नागरिक बनावे.कायदा मला माहित नाही,असे न म्हणता कायद्याचे ज्ञान घ्यावे व ते व्यावहारिक जीवनात पाळावे.मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय विवाह करू नये आणि बालविवाहमुक्त भारत निर्माण करण्याचा संकल्प करावा.तसेच पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी प्रयत्नशील राहावे,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर कार्याध्यक्ष एम. डी. देशमुख,मुख्य न्यायरक्षक अ‍ॅड. अमोल गुंड,उपमुख्य न्यायरक्षक अ‍ॅड. अभय पाथरूडकर, उपशिक्षणाधिकारी दत्तात्रेय जंगम, विस्तार अधिकारी भारत देवगुडे, प्राचार्य विक्रमसिंह देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

विधीसंघर्षीत बालक,मुली व महिलांच्या संदर्भातील समस्या निर्मूलनासाठी कायद्याचे शिक्षण आवश्यक असल्याचे नमूद करताना मुख्य न्यायरक्षक अ‍ॅड.अमोल गुंड यांनी सांगितले की,शारीरिक,बौद्धिक व मानसिक परिपक्वता आल्यानंतरच आणि कायद्याचे पालन करूनच वैवाहिक जीवनास सुरुवात करावी. बालविवाह होत असल्यास १५१०० या क्रमांकावर संपर्क साधून कायद्याच्या रक्षणासाठी सहकार्य करावे,असेही त्यांनी सांगितले. उपमुख्य न्यायरक्षक अ‍ॅड.अभय पाथरूडकर यांनी प्लास्टिकचा वापर टाळावा, मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे व वन्यजीवांचे संरक्षण करावे, असे आवाहन केले.

उपशिक्षणाधिकारी दत्तप्रसाद जंगम यांनी मुलींनी पालक व नातेवाईकांच्या दबावाला न बळी पडता शिक्षण घ्यावे व योग्य निर्णयक्षम बनावे,असे सांगितले.

समाजासाठी कार्यरत राहण्यासाठी मुलांनी उच्चशिक्षित व्हावे,असे आवाहन एम.डी.देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक आण्णासाहेब कुरुलकर यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक आनंद वीर यांनी तर फलप्राप्तीचे महत्त्व सांगून आभार प्राचार्य विक्रमसिंह देशमुख यांनी मानले. कार्यक्रमास प्रशालेतील शिक्षक,विद्यार्थी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा उद्योजकांनी समाज घडविण्याचे कार्य करावे - अध्यक्ष बी. बी. ठोंबरे




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- मराठा समाजात मोठ्या संख्येने उद्योजक आहेत. पण ते विखुरलेले आहेत. या उद्योजकांना एकत्रित करून प्रोत्साहन देण्याचे कार्य एमईए (मराठा उद्योजक संघटना) करत आहे. या संघटनेत मराठा उद्योजकांनी जास्तीत जास्त योगदान देऊन तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन नॅचरल शुगर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी केले.

धाराशिव येथे मराठा उद्योजकांचा भव्य मेळावा शनिवार, १० जानेवारी रोजी पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मंचावर उद्योजक हनुमंत मडके, विक्रम गायकवाड, पी. के. मुंडे, चित्राव गोरे, विजय बारकुल, सतीश देशमुख, उमेश सोकांडे, विक्रम नरसाळे, बालाजी येरुळे, आश्रम काळे आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुढे बोलताना श्री. ठोंबरे म्हणाले, मराठा समाजातले तरुण आज रोजगार निर्मितीत उतरले पाहिजेत. कारण सर्वांना नोकऱ्या मिळत नाहीत. म्हणून मराठा उद्योजकांनी जास्तीत जास्त उद्योग निर्मितीत उतरले पाहिजे. ग्रामीण भागात उद्योगाच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. यामध्ये शेतीमाल प्रक्रिया, पशुपालन व इतर क्षेत्रात काम करून उद्योग निर्मिती करता येते. यातून मराठा तरुणांनी एकत्र येऊन उद्योग उभारणी करावी असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजक तथा एमईएचे अध्यक्ष विक्रम गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचा उद्देश विषद केला. ते म्हणाले, मराठा उद्योजकांना एकत्र करून मराठा समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध देण्याचा आमचा उद्देश आहे. मराठा समाजातील उद्योजकांनी आपला उद्योग फेल होईल याची भीती बाळगू नये. उद्योजकांना कर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. यावेळी उद्योजक हनुमंत मडके, पी. के. मुंडे, चित्राव गोरे, विजय बारकुल, सतीश देशमुख, उमेश सोकांडे, विक्रम नरसाळे, यांनीही मराठा समाजातील उद्योजकांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. मेळाव्यात धारशिव शहर व जिल्ह्यातील उद्योजकांचा सत्कार करण्यात आला.मेळाव्याचे सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी केले. मेळाव्यामध्ये अनेक उद्योजकांनी आपल्या मान्य शंकांचे निरसन केले. मेळाव्याला मराठा समाजातील तरुण उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राणा दादाच्या विश्वासावर उतरणारे युवा नेतृत्व म्हणजे कळंब उपनगराध्यक्ष पदासाठी शितल चोंदेच



कळंब (रामेश्वर डोंगरे ) -कळंब नगर परिषदेत नुकतेच निवडून आलेले नगरसेवक शितल रामचंद्र चोंदे हे उपनगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टी कडून एक अत्यंत सक्षम विश्वासह आणि जनतेच्या मनात घर केलेलं नाव ठरत आहेत समाजसेवेची तळमळ कामाची प्रमाणिकता आणि पक्ष वाढीसाठी अहोरात्र झटण्याची तयारी या गुणामुळे शितल चोंदे आज कळंबच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण करत आहेत सर्वसामान्य नागरिकाचे प्रश्न असोत विकास कामाचा पाठपुरावा असो किंवा पक्ष संघटन मजबूत करण्याचे काम असो शितल चोंदे हे २४ तास जनतेसाठी हजर असणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात पक्षासाठी ते कधीही मागे हटत नाहीत विशेष म्हणजे माननीय आमदार राणा दादा पाटील यांचे ते खांदे समर्थक असून राणा दादाचा एकही शब्द न मोडणारे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे कळंबच्या सर्वांगीण विकासासाठी उपनगराध्यक्ष पदाचा युवा ऊर्जावान आणि काम करणारे नेतृत्व आवश्यक आहे आणि ही जबाबदारी शितल चोंदे समर्थपणे पेलू शकतात असा ठाम विश्वास कळंबच्या जनतेमध्ये दिसून येतो त्यामुळे च शीतल चोंदे यांनाच उपनगराध्यक्ष करा ही मागणी आता जनतेच्या मनातून जोर धरू लागली आहे माननीय आमदार राणा दादा पाटील तसेच माननीय मल्हार दादा पाटील यांचीही भूमिका स्पष्ट असून कळंब नगरपालिकेवर एक तरुण कामकाजात सक्रिय आणि पक्षासाठी उपयुक्त उपनगराध्यक्ष असावा अशी सर्वांची भावना आहे याचा फायदा आगमी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये भाजपला निश्चितच होणार आहे म्हणूनच कळंबच्या जनतेच्या मनात आज एकच इच्छा आहे उपनगराध्यक्षपदी शीतल रामचंद्र चोंदे यांची निवड व्हावी जनतेचा विश्वास नेतृत्वाची क्षमता आणि राणा दादा च्या आशीर्वाद याचा संगम असलेले शितल चोंदे हे पद भूषवतील आणि कळंबच्या विकासाला नवी दिशा देतील यात शंका नाही.

## चाकुचा धाक दाखवून मारहाण करुन ट्रॅक्टर पळविला: गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, फिर्यादी सचिन शिवाजी काळे, वय २९ वर्षे, रा. पारा ता. वाशी जि. धाराशिव यांचा अंदाजे ५,००,००० किंमतीचा महिंद्रा अर्जुन ५५५ कंपनीचा ट्रॅक्टर हा दि. ०८.०१.२०२६ रोजी सु. भैरवनाथ साखर कारखान्याचे यार्डात तांदुळवाडी शिवार येथुन शिवा दादा शिंदे, सरदार दादा शिंदे दोघे रा. नांदुरघाट ता. केज जि. बीड यांनी सचिन काळे यांना चाकुचा धाक दाखवून मारहाण करुन जिवे ठार मारण्याची धमकी देवून जबरीने घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सचिन काळे यांनी दि.०९.१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९(४),३५२, ३५१(२),(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.फिर्यादी यांनी दिलेल्या माहिती वरुन वाशी पोलीसांनी सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान आरोपी नामे- शिवा दादा शिंदे, सरदार दादा शिंदे दोघे रा. नांदुरघाट ता. केज जि. बीड यांना ताब्यात घेवून सदर गुन्ह्या बाबत चौकशी केली असता नमुद आरोपींनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. पुढील तपास सुरु आहे.

# सिकलसेल मुक्त महाराष्ट्रासाठी 'अरुणोदय' मोहीम; एकही नागरिक तपासणीपासून वंचित राहणार नाही

धाराशिव,दि.९ जानेवारी (जिमाका) राज्यातील सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये 'अरुणोदय : विशेष सिकलसेल तपासणी पंधरवडा' ही मोहीम दिनांक १५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.या मोहिमेअंतर्गत एकही नागरिक सिकलसेल तपासणीपासून वंचित राहू नये,असे नियोजन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना (साकोरे) बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यात मोहिमेची पूर्वतयारी करण्यात आली आहे. या तपासणी मोहिमेदरम्यान सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये एकही नागरिक तपासणीपासून वंचित राहू नये यासाठी सर्व यंत्रणांनी प्रभावी नियोजन केले आहे. सिकलसेल आजाराचे लवकर निदान, रुग्णांना योग्य उपचार व संदर्भसेवा उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे असून राज्यात एकही सिकलसेल रुग्ण तपासणीपासून वंचित राहू नये,अशा सूचना आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिल्या आहेत.

राज्यात १ कोटी ५ लाखांहून अधिक तपासण्या; १२,४२० रुग्ण, १,२४,२७५ वाहक सन २०१९ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यात एकूण १ कोटी ०५ लाख ८६ हजार ७३३ सोल्युबिलिटी चाचण्या करण्यात आल्या असून त्यामध्ये १२,४२० सिकलसेल रुग्ण आणि १,२४,२७५ सिकलसेल वाहक आढळून आले आहेत.

राज्यात सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम सन २००८ पासून आदिवासी व दुर्गम भागांत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. ठाणे, नाशिक,नंदुरबार,अमरावती,गोंदिया, गडचिरोली,पालघर,नागपूर,वर्धा,चंद्रपूर, भंडारा,यवतमाळ,धुळे,जळगाव,बुलढाणा, नांदेड,वाशिम,अकोला,छत्रपती संभाजीनगर,रायगड व हिंगोली या २१ जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे.

या कार्यक्रमांतर्गत जनजागृती,मोफत सोल्युबिलिटी चाचणी, इलेक्ट्रोफोरेसिस व एचपीएलसी तपासणी,मोफत औषधे, समुपदेशन,नियमित आरोग्य तपासणी, गरजेनुसार रक्त संक्रमण, टेलिमेडिसीनद्वारे तज्ज्ञांचा सल्ला आदी सुविधा देण्यात येतात.

**सिकलसेल आजार म्हणजे काय**

सिकलसेल हा अनुवंशिक आजार असून आई-वडिलांकडून अपत्यांना होतो. हा लाल रक्तपेशींशी संबंधित आजार आहे.सामान्य रक्तपेशी वर्तुळाकार व लवचिक असतात,तर सिकलसेल रक्तपेशी विळ्याच्या आकाराच्या व ताठर असतात. त्या रक्तवाहिन्यांना चिकटून राहतात, त्यामुळे रक्तपुरवठा खंडित होतो. यालाच सिकलसेल क्रायसिस म्हणतात. त्यामुळे तीव्र वेदना होतात आणि वारंवार इजा झाल्याने अवयव निकामी होऊ शकतात. प्लीहा सुजते,रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग वाढतो.हाडे,फुफ्फुसे, यकृत,प्लीहा,मेंदू तसेच डोळे,स्वादुपिंड, त्वचा यांवर परिणाम होऊ शकतो.

**प्रतिबंधासाठी काय करावे**

विवाहापूर्वी सिकलसेल तपासणी करावी. लाल (डड) व पिवळे (-ड) गुणधर्म असलेल्यांनी परस्पर विवाह टाळावा. सिकलसेलग्रस्त किंवा वाहक रुग्णांनी निरोगी व्यक्तीशी विवाह करावा. सिकलसेलग्रस्त मातांनी गर्भधारणेनंतर आठ **आठवड्यांच्या आत गर्भजल तपासणी करून घ्यावी.**

सिकलसेलची लक्षणे : हिमोग्लोबिन कमी होणे,हातपाय सूजणे,भूक मंदावणे,सांधे दुखणे,तीव्र वेदना,लवकर थकवा,चेहरा निस्तेज दिसणे.

**उपचार काय**

सिकलसेलचा पूर्ण उपचार नाही; मात्र योग्य औषधोपचार,नियमित तपासणी,फॉलिक सिड व इतर औषधे,भरपूर पाणी, वेदनाशामक औषधे,समतोल आहार,गरज असल्यास रक्त संक्रमण,तसेच काही प्रकरणांत बोनमॅरो ट्रान्सप्लांटेशनद्वारे पूर्ण बरे होण्याची शक्यता असते. अर्थसहाय्य व सवलती सिकलसेलग्रस्त रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळते.१० वी व १२ वीतील विद्यार्थ्यांना परीक्षेत प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जातो.बस प्रवासात सवलत मिळते.

राज्यातील अधिकाधिक नागरिकांनी जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात सिकलसेल तपासणी करून घ्यावी व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## यश मुख्यमंत्र्याच्या परिश्रमाने मिळणार

राज्यात महानगरपालिकेची निवडणुक जाहिर झाल्यानंतर अनेक दिग्गज प्रचारात उतरले आहेत. स्टार प्रचारकाने तर धुमाकुळ घातला आहे. प्रत्येक आपल्या पक्षाची भुमिका सांगत असून आपण कसा शहराचा विकास साधणार आहोत हे सांगत आहेत. सांगणे हे प्रत्येक पक्षाची जबाबदारी आहे. आपल्याच पुर्वजांनी 'शब्द हे शस्त्र आहेत' असे म्हटले आहे. शब्दाचा प्रयोग सांभाळून केला पाहिजे. हे ज्यांना कळाले ते जपून शब्द वापरतात. या देशाचे नेते ना. नितीन गडकरी तरबेज आहेत. रविंद्र चव्हाण हे भाजपाचे प्रादेशिक अध्यक्ष आहेत. मोठी जबाबदारी आहे. त्यांनी लातूरात बोलल्याचा परिणाम राज्यभर झाला. त्यामुळे पूर्ण परिस्थिती बदलुन गेली. भाजपाला पोषक असणारे वातावरण फिरले ते कॉंग्रेसला पोषक झाले. त्यानंतर मुख्यमंत्र्याचा दौरा लातूरात झाला. वातावरण बदलुन गेले. अचानक बदल पुन्हा दिसू लागला. भाजपाला अनेक राज्यात यश मिळत आहे. काही राज्यात नाराजगीचा परिणाम आहे. असे जरी असले तरी राज्यात महानगरपालिकेची निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या परिश्रमाचा परिणाम सकारात्मक दिसून येणार आहे. लातूरसह त्यांनी सोलापूर, छत्रपतीसंभाजीनगर, पुणे आदि ठिकाणी सभा झाल्या. यात त्यांनी स्थानिक प्रश्न सोडविण्याची तयारी व आगामी काळात शहराचा कसा विकासाने कायापालट करू या बाबतच बोलले. कोणावरही टिका केली नाही. कोणाचा रोष अंगावर घेतला नाही. त्यामुळे भाजपाविषयक प्रेम मतदाराच्या मनात जागृत झाले आहे. मतदारांना विकास हवा आहे. विकासाबाबतच बोलले तर जनतेला आवडते. टिका सहसा आवडत नाही. रविंद्र चव्हाण यांची केलली चुक तशी भाजपाला परवडणारी नाही. तरी सर्वांना सांभाळून घेतले आहे. याचा अर्थ भाजपाला गाफील राहुन चालणार नाही. भाजपाला मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावे लागणार आहेत. तसे पाहिले तर भाजपाला सर्वात महत्वाची महानगरपालिकेची निवडणुक ही मुंबईची आहे. कोणत्याही परिस्थितीत मुंबई महानगरपालिका हाती घेण्याचा विचार आहे. मुंबई महानगरपालिका आपल्याकडे राहावी यासाठी राज व उद्धव ठाकरे यांना एकत्र यावे लागले आहे. दोघांचे प्रयत्न किती सफल होतात हे निवडणुक निकालानंतर कळून येणार आहे. महानगरपालिकेची निवडणुकीत तसे फारसे प्रश्न नसतात. जनतेची मागणी दर पाच वर्षांनी असते तीच असते. एकतर पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता व उमेदवार सतत भेटणार असावा, यापेक्षा मोठी समस्या नगरात नसते. त्यामुळे सध्याला विधानसभेसारखे वातावरण निर्माण केला जात आहे ते किती योग्य आहे याचा मतदार नागरिकांनी विचार केला पाहिजे. राज्यात सर्वांचे लक्ष हे मुंबईकडे अधिक आहे. बाकीच्या ठिकाणी नाही असे नाही आहे मात्र मुंबई सर्वात महत्वाची मोठी आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे भाजपाचे लक्ष अधिक प्रमाणात याकडे असणे स्वाभाविक आहे. यापुढे सर्व पक्षांनी एक जबाबदारी घेतली पाहिजे की, कोणी वाचाळ बोलणार नाही. कोणावर टिका करणार नाही याची जबाबदारी घेतली पाहिजे. एक चुक किती महागात पडते हे नुकतेच रविंद्र चव्हाणांच्या वक्तव्यामुळे कळाले असेल. तसे पाहिले तर मुख्यमंत्र्यांनी सतत महागनराचा महीण्यातून एकदा तरी आढावा घेतला पाहिजे. असे तर यापुढे झाले तर यापुढे सध्याला परिश्रम घ्यावे लागणार नाही. भाजपामध्ये जनतेची मने जिंकणारा नेता तसा एकमेव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच दिसून येतात. देवेंद्र फडणवीस जेथे सभा घेतली तेथील वातावरणात बदल दिसून येत आहे. वास्तविक कॉंग्रेसकडून अजूनतरी स्टार प्रचारक बाहेर पडल्याचे दिसून येत नाहीत. दिल्लीतून काही नेत्यास राज्यातील महानगर पालिकेच्या निवडणुक प्रचारात पाठविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक कॉंग्रेस पक्षापेक्षा लातूरात देशमुख परिवारास मानणारा वर्ग मोठा आहे. याला वडीलांची पुण्याई म्हणा किंवा अजूनही विलासरावांच्या नावाने मत मागितले जातात अशी टिका निरर्थक दिसून येत आहे. त्यांनी जे केले तेच दिसून येत आहे. बाकींच्यांनी केले नाही तर टिका करणे निरर्थक आहे. राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर जिल्हापरिषदेची निवडणुक लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे जवळपास अनेक ठिकाणी प्रशासकिय राज आहे ते लवकरच संपणार आहे. महानगरपालिका व जिल्हापरिषदेच्या निवडणुका वरचेवर लांगणीवर पडल्या होत्या. महानगरपालिकेची निवडणुकीचा निकालानंतरचा अंदाज जिल्हा परिषदेचा अंदाज कळणार आहे. राज्यात सध्याला अटीतटीचे आव्हाण आहे. मतदार कोणाला साथ देईल हे कळणे आवघड आहे. भाजपा व एकनाथ शिंदे एक झाले मात्र अजित पवारांची राष्ट्रवादी भाजपासोबत नाही. याचा परिणाम काय होईल हे आज सांगता येत नाही. नंतर अजित पवार यांची राष्ट्रवादी यदाकदाचित भाजपासोबत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कठिण काळ हा कॉंग्रेसचा असणार आहे. त्यामुळे सर्वाधिक जोर कॉंग्रेस पक्षाला मारावा लागणार आहे. कॉंग्रेसचे प्रचारकांनी बाहेर पडले पाहिजे. वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळी परिस्थिती आहे. काही ठिकाणी मतविभाजनाचा फटका बसण्याची शक्यता आहे तर काही ठिकाणी छोट्या पक्षामुळे लाभही होणार आहे. अशा स्थितीत राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी उरलेल्या ठिकाणी कमजोर समजल्यया जाणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रचारात भाग घ्यावा लागणार आहे. सध्याला महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे. मोठी बजेट असणाऱ्या महानगरपालिकडे लक्ष खुद मुख्यमंत्री दिले पाहिजे. सर्वांनी तोंडाला लगाम लावुन बोलले पाहिजे. नसता सकारात्मक असणारे वातावरण विरोधात बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. लातूरात बिघडत चाललेली परिस्थिती ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे काही प्रमाणात सुधारली आहे. केवळ भाजपामध्ये सध्याला मुख्यमंत्री एकमेव स्टार प्रचारक दिसून येत आहेत. राज्यात भाजपाला सहज वाटणारी महानगरपालिकेची निवडणुक सोपी नाही. काही ठिकाणी स्वकिय व सत्तेत असणाऱ्या पक्षाकडून नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे राज्यात मुख्यमंत्री एकटेच खिंड लढवित आहेत असे चित्र दिसून येत आहे. मुळात सध्याला जनतेला पर्याय मिळत नाही किंवा दिला जात नाही तो पर्यंत भाजपाची घोडदौड चालू राहील अशी शक्यता दिसून येत आहे. नेते टिका करतात मात्र मजबुत पर्याय देत नाही ही वस्तूस्थिती आहे.

# पोटदुखीसाठी सतत पेनकिलर खाणे टाळा, ट्राय करा 'हे' घरगुती उपाय



चुकीच्या जीवनशैलीच्या सवयी, जास्त जंक फूडचे सेवन, अपुरे पाणी पिणे आणि अपचन या सर्वांमुळे पोटदुखी होऊ शकते. पोटदुखी खूप वेदनादायक असू शकते आणि त्यामुळे एखाद्या व्यक्तीला कोणत्याही गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे कठीण होते. बरेच लोक पोटदुखी कमी करण्यासाठी औषधे घेतात.

परंतु सतत औषधे आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. म्हणून, पोटदुखी कमी करण्यासाठी तुम्ही काही सोपे घरगुती उपाय ट्राय करून पाहू शकता.चला पाहूया पोटदुखी कमी करणारे हे घरगुती उपाय कोणते आहेत.

हिंग–

आयुर्वेदानुसार, पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी हिंगचा वापर शतकानुशतके केला जात आहे. पोटदुखी कमी करण्यासाठी तुम्ही हिंगचे पाणी पिऊ शकता. एका ग्लास कोमट पाण्यात एक चिमूटभर हिंग घाला. ते चांगले मिसळा आणि दिवसातून दोन ते तीन वेळा प्या. यामुळे पोटदुखीपासून लवकर आराम मिळेल.

बडीशेप–

बडीशेप पोटदुखीपासून आराम देतेच पण पचन देखील सुधारते. बडीशेपमध्ये असलेले गुणधर्म पोटातील हानिकारक बॅक्टेरिया नष्ट करण्यास मदत करतात. गॅस आणि पोटफुगीसारख्या पोटाच्या समस्यांपासूनही आराम मिळतो.

पुदिना–

पोटदुखीवर घरगुती उपाय म्हणून पुदिन्याचा वापर करता येतो. यासाठी एक कप पाण्यात ५-६ पुदिन्याची पाने घाला आणि ते १० मिनिटे उकळवा. मिश्रण गाळून घ्या आणि थोडे मध घाला. दिवसातून दोन ते तीन वेळा हे सेवन करा. यामुळे पोटदुखी आणि गॅसच्या समस्यांपासून आराम मिळेल.

आले–

पोटदुखीपासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही आल्याचे सेवन करू शकता. त्यात अँटीबॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आहेत.जे पोटदुखी आणि अपचन यासारख्या समस्यांपासून, आराम देण्यास मदत करतात. यासाठी, आल्याचा तुकडा किसून घ्या आणि तो एका ग्लास पाण्यात घाला. ते उकळून घ्या आणि नंतर त्यात एक चमचा मध घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा घ्या. लवकरच आराम मिळेल.

# त्वचेच्या 'या' समस्या असतील तर चेहऱ्यावर अजिबात लावू नका टोमॅटोचा रस, होतील दुष्परिणाम



आपल्या सर्वांनाच माहिती आहे की, टोमॅटो केवळ आरोग्यासाठीच नाही तर त्वचेसाठी देखील फायदेशीर आहे. टोमॅटो त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर करतो. टोमॅटोमध्ये अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी आणि लायकोपीन आढळते. जे त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात.

त्वचेचे सौंदर्य वाढवण्यासाठी लोक अनेकदा चेहऱ्यावर टोमॅटोचा रस वापरतात. त्वचेवरील डाग आणि टॅनिंग दूर करण्यासाठी टोमॅटोचा रस प्रभावी आहे. परंतु काही लोकांना टोमॅटोच्या रसाची ऍलर्जी असू शकते. म्हणून, प्रत्येकाने त्यांच्या चेहऱ्यावर टोमॅटोचा रस अजिबात लावू नये. आज आपण जाणून घेऊया त्वचेच्या कोणत्या समस्यांमध्ये टोमॅटोचा रस लावू नये.

कोरडी त्वचा–

जर तुमची त्वचा कोरडी असेल तर टोमॅटोचा रस वापरणे टाळा. टोमॅटोचा रस तुमची त्वचा आणखीन कोरडी आणि डिहायड्रेट करू शकतो. जर तुमची त्वचा कोरडी असेल आणि तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर टोमॅटोचा रस लावला तर पिंपल्स येऊ शकतात.

पिंपल्स–

जर तुमच्या चेहऱ्यावर पिंपल्स असतील तर टोमॅटोचा रस अजिबात लावू नका. टोमॅटोच्या रसातील आम्ल तुमची त्वचा संवेदनशील बनवू शकते. टोमॅटोचा रस पिंपल्स वाढवू शकतो.

संवेदनशील त्वचा–

जर तुमची त्वचा संवेदनशील असेल तर टोमॅटोचा रस तुमच्या चेहऱ्यावर लावणे टाळा. टोमॅटोचा रस संवेदनशील त्वचेला त्रासदायक ठरू शकतो. ज्यामुळे सूज आणि लालसरपणा येऊ शकतो. टोमॅटोमध्ये नैसर्गिक आम्ल असतात, जे संवेदनशील त्वचेवर परिणाम करू शकतात.

त्वचेवर सूज–

जर तुमच्या त्वचेवर जळजळ किंवा सूज असेल तर टोमॅटोचा रस लावू नका. टोमॅटो जळजळ वाढवू शकतात, ज्यामुळे चेहऱ्यावर सूज येऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, एक्झिमासारख्या त्वचेच्या आजारांमुळे जळजळ होऊ शकते. जर तुम्हाला ही स्थिती असेल तर टोमॅटोचा रस वापरणे टाळा.

# हिवाळ्यात शरीरात वाढतो वात दोष, नियंत्रित करण्यासाठी करा 'हे' उपाय



हिवाळ्यात शरीरात वात दोषाची समस्या वाढते. आयुर्वेदानुसार, जेव्हा वातावरण थंड आणि कोरडे असते तेव्हा वात दोष देखील अधिक सक्रिय होतो. हिवाळ्यात थंड वारे आणि कमी तापमानामुळे शरीरात वात दोष निर्माण होऊ शकते. त्याचे परिणाम सांधेदुखी, त्वचेचा कोरडेपणा, स्नायूंमध्ये कडकपणा, झोपेच्या समस्या, पचनाच्या समस्या आणि मानसिक ताण या स्वरूपात दिसून येतात.

या ऋतूत वात संतुलित करण्यासाठी आयुर्वेदिक उपायांचे पालन करणे फायदेशीर असते. आयुर्वेदात वात नियंत्रित करण्यासाठी नैसर्गिक पद्धतींबाबत सांगितले आहे. ज्या पद्धतींचा अवलंब करून हिवाळ्यात शरीर निरोगी आणि संतुलित ठेवता येते.चला जाणून घेऊया हे उपाय कोणते आहेत

तिळाच्या तेलाने अभ्यंग करा–

हिवाळ्यात नियमित तिळाच्या तेलाने अभ्यंग केल्याने वातदोष नियंत्रित करणे अत्यंत फायदेशीर ठरते. तिळात तेलाचा तापमानवाढीचा प्रभाव असतो. त्यामुळे वात शांत होतो आणि शरीर उबदार राहते. या मालिशमुळे स्नायूंची जळजळ कमी होते आणि रक्ताभिसरण सुधारते.

गरम पाण्याने आंघोळ करणे–

हिवाळ्यातील थंडीपासून बचाव करण्यासाठी, गरम पाण्याने आंघोळ करणे आणि उबदार कपडे घालणे आवश्यक आहे. आयुर्वेदात थंड आणि उष्ण या गुणांचा विशेषतः उल्लेख आहे. थंडीचा गुण वात वाढवतो, तर उबदारपणा वात शांत करतो. गरम पाण्याने आंघोळ केल्याने शरीर उबदार राहते, ज्यामुळे वात दोष संतुलित होण्यास मदत होते. शिवाय, हिवाळ्यात गरम कपडे घालल्याने वात दोष नियंत्रित होण्यास देखील मदत होते.

लसूण आणि आले खा–

लसूण आणि आल्याचा वापर आयुर्वेदात प्राचीन काळापासून वात नियंत्रित करण्यासाठी केला जात आहे. दोन्ही रक्ताभिसरण सुधारतात आणि शरीराला आतून उबदार ठेवतात. हिवाळ्यात त्यांचे सेवन केल्याने वात कमी होतो.

नियमित व्यायाम–

हिवाळ्यात वात दोष संतुलित करण्यासाठी नियमित व्यायाम आणि योगासने आवश्यक आहेत. नाडी शोधन प्राणायाम, सूर्यनमस्कार आणि चालणे यासारखे व्यायाम वात दोष संतुलित करण्यास मदत करतात. हे व्यायाम शरीराची उष्णता राखण्यास आणि वात दोष नियंत्रित करण्यास मदत करतात.

## घरबसल्या करा जन्म प्रमाणपत्रासाठी अर्ज, हा आहे सोपा मार्ग

जन्म प्रमाणपत्र हा एक दस्तऐवज आहे, जो नेहमी उपयुक्त असतो. मुलाच्या जन्मानंतर २१ दिवसांच्या आत ते तयार करणे आवश्यक आहे. परंतु अनेक वेळा घरातील कामामुळे किंवा उत्सवामुळे प्रमाणपत्र काढण्यासाठी कार्यालयात जाण्यास वेळ मिळत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही घरी बसून जन्म प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करून बराच वेळ वाचवू शकता. यासाठी तुम्हाला ही सोपी प्रक्रिया फॉलो करावी लागेल.

सरकारी कार्यालयात जाऊनही जन्म प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येतो. परंतु तुम्हाला ऑनलाइन अर्ज करायचा असेल तर संबंधित राज्याच्या नागरी सेवांच्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन अर्ज करा. एक गोष्ट लक्षात ठेवा की जन्म प्रमाणपत्रासाठी मुलाच्या पालकांची कागदपत्रे आवश्यक आहेत. यामध्ये जन्मपत्रिका देणारे रुग्णालय यावर भर देतात. याशिवाय पालकांचे आधार कार्ड, त्यांच्याकडे लग्नाचे प्रमाणपत्र असल्यास त्याची प्रत जमा करावी.

प्रक्रिया पूर्ण

जन्म प्रमाणपत्रासाठी, प्रथम अधिकृत वेबसाइटवर जा. यानंतर जनरल पब्लिक साइन अप या पर्यायावर क्लिक करा. एक नवीन पृष्ठ उघडेल, येथे सर्व तपशील भरा. तपशील भरल्यानंतर, नोंदणी पर्यायावर क्लिक करा.

यानंतर तुमच्या मेल आयडी आणि मोबाईल नंबरवर यूजर आयडी आणि पासवर्ड पाठवला जाईल. आता यूजर आयडीने लॉगिन करा आणि पुढे जा. लॉग इन केल्यानंतर, जन्म प्रमाणपत्राच्या पर्यायावर क्लिक करा.

आता अर्ज तुमच्यासमोर उघडेल, त्यात आवश्यक ते सर्व तपशीलही भरा. सर्व गोष्टी पूर्ण झाल्यानंतर, तुम्हाला एका आठवड्यात जन्म प्रमाणपत्र मिळेल.

ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, जन्म प्रमाणपत्र तुमच्या हातात येईल. यानंतर, तुम्हाला इकडे-तिकडे जाण्याची गरज नाही आणि तुमच्या मुलाचे जन्म प्रमाणपत्रही तयार केले जाईल.

## हिवाळ्यात रात्री स्वेटर घालून झोपणे योग्य की अयोग्य?

हिवाळा सुरू झाला आहे. लोकांना आधीच थंड वाऱ्यांचा त्रास होत आहे. थंडीपासून स्वत:चे रक्षण करण्यासाठी लोक स्वेटर आणि लोकरीचे कपडे घालतात. हे केवळ शरीराला उबदारपणा देत नाहीत तर थंड वाऱ्यापासून त्यांचे संरक्षण देखील करतात. बरेच लोक कडकडत्या थंडीपासून बचाव करण्यासाठी झोपताना जाड ब्लँकेट वापरतात. मात्र, काही लोकांना ब्लँकेट वापरून देखील स्वेटर आणि मोजे घालून झोपण्याची सवय असते. परंतु, रात्री लोकरीचे कपडे घालून झोपणे योग्य आहे की नाही याबद्दल अनेकांना शंका आहे. रात्री स्वेटर आणि मोजे घालून झोपल्यावर शरीराचे काय होते ते जाणून घेऊया.

स्वेटर घालून झोपणे चांगले आहे का? आरोग्य तज्ञांच्या मते, अनेक लोकांना उबदारपणा आणि आरामासाठी स्वेटर घालायला आवडते. परंतु काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. बाहेर जाताना स्वेटर घालणे चांगले. थंड वाऱ्यापासून स्वत:चे रक्षण करण्यासाठी हा सर्वोत्तम पर्याय आहे. मात्र, घरात स्वेटर घालण्यामुळे घाम येऊ शकतो. घाणेरडे किंवा जुने स्वेटर घालण्यामुळे पुरळ आणि जळजळ होऊ शकते. त्यामुळे झोप देखील बिघडू शकते. म्हणूनच तज्ञ म्हणतात की सैल, आरामदायी स्वेटर घाला. टी-शर्टवर स्वेटर घालून झोपणे देखील चांगली कल्पना आहे.

कोणत्या प्रकारचे कपडे घालावे? झोपेची गुणवत्ता सुधारण्यासाठी योग्य कपडे निवडणे खूप महत्वाचे आहे. नेहमी सुती, तागाचे किंवा मिश्रित कपडे निवळा. हे ओलावा काढून टाकतात. तसंच त्वचेला श्वास घेण्यास परवानगी देतात. सैल कपडे झोपेत अडथळा आणत नाहीत. थंड हवामानात सैल स्वेटर घातल्याने शरीर उबदार राहते. चांगली झोप येते.

मोजे घालून झोपू शकता का? हिवाळ्यात मोजे घालणे अनेकांना आरामदायक वाटते. पण ते योग्यरित्या घालणे आवश्यक आहे. हिवाळ्यात उबदार मोजे पायांना थंडीपासून वाचवतात. त्यामुळे झोपही चांगली येते. मात्र, घट्ट मोजे रक्ताभिसरणात अडथळा आणतात. म्हणून सैल किंवा ताणलेले मोजे निवडा. दररोज फक्त स्वच्छ मोजे घाला. घाणेरडे मोजे पायांच्या त्वचेला नुकसान पोहोचवू शकतात. विविध समस्या उद्भवू शकतात.

ही सावधगिरी बाळगा

लोकरीच्या कपड्यांमधील खडबडीत तंतू आणि लहान छिद्रे शरीरातील उष्णता निर्माण करतात. हिवाळ्यात लोकरीचे कपडे घालूण झोपणे आणि त्यावर ब्लँकेटने स्वत:ला झाकणे यामुळे शरीराचे तापमान वाढते. मधुमेह किंवा हृदयरोग असलेल्या लोकांसाठी हे वाढलेले तापमान चांगले नाही.

तज्ञांचे म्हणणे आहे की, त्वचेच्या ॲलर्जीने ग्रस्त असलेल्या लोकांनी लोकरीचे कपडे घालू नयेत. कोरडी त्वचा असलेल्या लोकांसाठी ही समस्या अधिक तीव्र असते. त्यामुळे झोपण्यापूर्वी हलके कपडे घालणे आणि त्वचेला मॉइश्चराइझ ठेवणे चांगले.

चांगल्या झोपेसाठी काही टिप्स

झोपण्यापूर्वी तुमच्या खोलीत पूर्णपणे अंधार करा. अंधारात झोपल्याने मेलाटोनिनचे उत्पादन वाढते, जे झोप सुधारणारे संप्रेरक आहे.

झोपण्यापूर्वी टीव्ही, मोबाईल फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरू नका. यामुळे झोपेमध्ये व्यत्यय येऊ शकतो.

चांगल्या झोपेसाठी शरीराला योग्य आधार देणारी गादी आणि उशी निवडणे खूप महत्वाचे आहे.

झोपण्यापूर्वी कॅफिन आणि अल्कोहोल टाळा. दोन्हीही झोपेत व्यत्यय आणू शकतात.

झोपण्यापूर्वी ध्यान किंवा योगासने केल्याने ताण कमी होतो आणि झोप सुधारते.

## मुलांची नजर कमजोर झाल्यास दिसतात 'ही' लक्षणे, पालकांनी वेळीच ओळखा

डोळे हा शरीराचा अतिशय संवेदनशील आणि महत्वाचा अवयव आहे. अलीकडे मुलांना डोळ्यांच्या अनेक समस्या येतात. मुले अनेकदा त्यांच्या समस्या व्यक्त करू शकत नाहीत. म्हणून पालकांनी त्यांच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत. काही मुलांची दृष्टी कमकुवत असू शकते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे स्पष्टपणे दिसत नाही.

लहान वयातच मुलांच्या समस्या ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लहान वयातच समस्यांमधून बरे होणे देखील सहज शक्य होते. त्यामुळेच आज आपण मुलांमध्ये डोळ्यांच्या समस्यांची लक्षणे कशी ओळखायची ते जाणून घेऊया..

सतत डोळे चोळणे–

लहान मुलं थकल्यावर किंवा झोपेत असताना डोळे मिचकावतात. परंतु जर एखादे मूल दिवसा उजेडातही सतत डोळे चोळत किंवा मिचकावत असेल तर ते डोळ्यांच्या समस्येचे लक्षण असू शकते. तसेच मुलं जर तिरळी पाहात असतील तर हेसुद्धा डोळे खराब होण्याचे लक्षण आहे.

डोळ्यांच्या हालचाली मंद होणे–

मुलांमध्ये डोळ्यांच्या सामान्य हालचाली वेगाने होत असतात. पण, जेव्हा मूल एखाद्या वस्तूला हळू प्रतिक्रिया देते तेव्हा त्याच्या डोळ्यात समस्या असू शकतात. यामध्ये नायस्टॅग्मस किंवा स्ट्रॅबिस्मस यांचा समावेश असू शकतो.

अभ्यासात त्रास होणे–

मुले शाळेत प्रवेश करताच त्यांना पुस्तके वाचायला दिली जातात. या मुलांना वाचण्यात अडचण येऊ शकते. अशा परिस्थितीत, त्यांना न फटकारता त्यांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करा. तसेच, लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्या. त्यामुळे डोळ्यांच्या समस्या दूर होण्यास मदत होईल.

# काँग्रेसच्या विचारांना पाठिंबा देत भाजपचे माजी जिल्हा परिषद सदस्य ईश्वर गुडे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

## माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सर्वांचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी दिल्या शुभेच्छा

**लातूर/प्रतिनिधी:** काँग्रेस पक्षाच्या सर्वसमावेशक विचारधारेला आणि विकासाभिमुख धोरणांना समर्थन देत भारतीय जनता पक्षाचे पानगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य ईश्वर गुडे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

या प्रवेशामुळे परिसरातील राजकीय वातावरणात मोठी हालचाल निर्माण झाली असून काँग्रेस पक्षाची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे.

या प्रवेशप्रसंगी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सर्व नवप्रवेशित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे काँग्रेस परिवारात मनःपूर्वक स्वागत केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''काँग्रेस हा सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढणारा पक्ष असून नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवाचा आणि ताकदीचा पक्षाला



निश्चितच फायदा होईल.'' पुढील राजकीय वाटचालीसाठी त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

विशेषतः पानगाव जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे काँग्रेस पक्षाला ग्रामीण भागात अधिक बळ मिळाले आहे. स्थानिक पातळीवर संघटन मजबूत होऊन आगामी निवडणुकांमध्ये याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

ईश्वर गुडे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, भाजपमध्ये सामान्य कार्यकर्त्यांच्या अपेक्षा पूर्ण होत नसल्याने आणि काँग्रेस पक्षाची धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय व विकासाची भूमिका पटल्याने व सर्वसामान्याच्या हिताचे कार्यकरणारे सक्षम नेतृत्व काँग्रेसमध्ये असल्याने आपण असंख्य सहकार्यासह काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या सोबत आलेल्या अनेक कार्यकर्त्यांनीही काँग्रेसच्या नेतृत्वावर यावेळी विश्वास व्यक्त केला.

या पक्षप्रवेशा वेळी ईश्वर नाना गुडे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा माजी सरपंच पानगाव, श्रीरामजी हरिदास माजी चेअरमन पानगाव सेवा सहकारी सोसायटी,रामभाऊ हरिदास माजी ग्रामपंचायत सदस्य पानगाव, बाबुराव हरिदास जेष्ठ कार्यकर्ते भाजप,बबरुवान भंडारे,रामभाऊ फुले,भारत साहेब संपते, मुरलीधर डोणे सर, गुंडेराव तुरूप,गोविंदराव दुडे, पानगाव सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन गणेशराव वांगे,गोपाळराव शेंडगे, पानगाव चे माजी शहराध्यक्ष भाजप गणेशराव तुरूप, भागवतराव बनसोडे किशोर हरिदास, रमाकांत संपते, ॲड. किशोर शिरगिरे,, ॲड. राजकुमार कांबळे, ॲड. माधव गुडे, दिपकराव पेदे,माऊली संपते,आरुप कुलकर्णी , दत्तात्रेय भंडारे सुभाषराव गुडे, अभिमान बापू संपते, रामदास गुडदे परमेश्वर आरडले,,सचिन भंडारे, विजयकुमार जाधव, बलभीम जाधव,नागोराव जाधव,लक्ष्मण जाधव,बिभीषण जाधव,जगदीश संपते,फिरोज पठाण, प्रवीण आचार्य,सुरेंद्र हरिदास, कचरू सुळ,रुक्माजि संपतते, अमोल सुरवसे व्यंकटराव वांगे,सुरेश मुस्ने, रामदास उकरले संतोष चिताडे,रोहित तुरूप राम गोरे, जनार्दन बघिले , अनिल तरुण सिद्धेश्वर शेंडगे,वैजनाथ कस्पटे, यांच्यासह शेकडो पदाधिकारी नागरिक यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश मा. आमदार धीरज विलासरावजी देशमुख साहेब यांच्या हस्ते प्रवेश केला यावेळी हरिश्चंद्र लहाने गुरुजी, चंद्रचूड चव्हाण,सुरेश लहाने प्रभाकर केंद्रे,सर्जेराव मोरे,प्रमोद जाधव प्रवीण पाटील, आजीम मणियार,शिवाजी आचार्य , विवेक चव्हाण उत्तरेश्वर हलकुडे, उमर पठाण सिद्धेश्वर गालफडे, अभिजीत चव्हाण , प्रशांत पाटील, गुलाब चव्हाण, सुनील भंडारे आधी सह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला काँग्रेसचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच हा प्रवेश काँग्रेस पक्षासाठी उत्साहवर्धक ठरला असून आगामी काळात पक्षसंघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## भाजपा सरकारकडून कष्टकरी समाजाचा गौरव : सचिन साठे




**लातूर/प्रतिनिधी:** भाजपा सरकारने रशिया या देशामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारून कष्टकरी समाजाचा गौरव केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करत लंडनमधील घराचे जतन करण्याचा निर्णय घेतला, असे प्रतिसादन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वारस सचिन साठे यांनी केला.

लातूर शहरातील प्रभाग क्रमांक २ व ३ मधील उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत साठे बोलत होते. या सभेस निवडणुक प्रमुख माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, रामचंद्र तिरुके, बापूसाहेब राठोड, संजय दोरवे, पंडीत सूर्यवंशी, बालाजी केंद्रे, प्रभाग २ मधील उमेदवार रवि सुडे, अमर पटेल, पुष्पा भडीकर व निर्मलाताई कांबळे तसेच प्रभाग क्रमांक ३ मधील उमेदवार सुनिता अवचारे, राजकुमार गोजमगुंडे, प्रेमा बिराजदार व सुनिल कांबळे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना सचिन साठे म्हणाले की, भाजपा सरकारने देशातील सामान्य नागरिकांचे जीवन सुखी करण्यासाठी काम केले आहे. विकासाचा झंझावात करताना महापुरुषांचा सन्मानही राखला आहे. काँग्रेसने ७० वर्षाच्या सत्तेत गरिबांकडे पाहिले नाही. शेतकरी व कामागारांसाठी काम केले नाही. महापुरुषांच्या विचारांशी त्यांच्या देणे घेणे राहिले नाही. आता मात्र सत्ता गेल्यानंतर संविधान धोक्यात असल्याचे ते सांगत आहेत. भाजपा हाच संविधाचे रक्षण करणारा पक्ष आहे. लातूर शहरातही भाजपाने विकासकामे केली आहेत. भविष्यात लातूरचा विकास अधिक गतीने करण्यासाठी आपण भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे असे ते म्हणाले.

## तारा सुतारीया आणि वीर पहारिया यांच्या ब्रेकपची रंगली चर्चा

**मुंबई/प्रतिनिधी:** अभिनेत्री तारा सुतारीया आणि वीर पहारिया हे सध्या चर्चेचा विषय ठरत आहेत. हे कपल एकमेकांना वर्षभरापासून डेट करत असून तारा आणि वीर हे लाखो चाहत्यांचे आवडते कपल आहे. काही महिन्यांपूर्वीच आपलं नातं त्यांनी जगजाहीर केले असला तरी त्यांच्या ब्रेकअपच्या चर्चा सध्या सोशल मीडियावर रंगू लागल्या आहेत.काही महिन्यांपूर्वीच तारा आणि वीर मुंबईमध्ये एपी ढिल्लोंच्या कॉन्सर्टमहद एकत्र दिसले होते. याच कॉन्सर्ट दरम्यान एपी याने ताराला किस केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचण्ड व्हायरल झाला. विशेष म्हणेज त्या व्हिडीओ यामध्ये वीर ही त्यावेळी उपस्थित असताना दिसत होता, आणि त्याने दिलेल्या प्रतिक्रिया या चाहत्यांसाठी चर्चेचा विषय ठरला.

## पीएनजी ज्वेलर्सतर्फे 'चेन अँड बँगल्स महोत्सव'

### ग्राहकांसाठी खास सवलतींचा वर्षाव

**लातूर/प्रतिनिधी:** भारतातील विश्वासार्ह आणि वारसाहक्क लाभलेला दागिन्यांचा प्रतिष्ठित ब्रँड, 'पीएनजी ज्वेलर्स'ने २०२६ या नववर्षाचे स्वागत आपल्या बहुप्रतिक्षित 'चेन अँड बँगल्स महोत्सवा'ने अतिशय दिमाखात केले आहे. ५ जानेवारी २०२६ पासून देशभरात सुरू झालेल्या या महोत्सवामुळे ग्राहकांना सोन्याच्या चेन, तसेच सोने व हिऱ्यांच्या बांगड्यांच्या खरेदीवर आकर्षक सवलती मिळवण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

या उपक्रमाची माहिती देताना पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांनी भारतीय संस्कृतीतील दागिन्यांच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, भारतीय विवाहसंस्कृतीत चेन आणि बांगड्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे केवळ दागिने नसून ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणारा वारसा आणि विश्वासाचे प्रतीक आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहकांनी या मौल्यवान दागिन्यांमध्ये गुंतवणूक करावी आणि या योजनांचा लाभ घ्यावा, अशी आमची इच्छा आहे. मूल्य, वैविध्य आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा त्रिवेणी संगम साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

या अंतर्गत ग्राहकांना सोन्याच्या चेन आणि बांगड्यांच्या खरेदीवर घडणावळीमध्ये (मेकिंग चार्जेस) प्रति ग्रॅम तब्बल ५१५ रुपयांची थेट सवलत दिली जात आहे. एवढेच नव्हे तर, हिऱ्यांच्या बांगड्यांच्या घडणावळीवर थेट ५० टक्के सूट जाहीर करण्यात



आली आहे. ही खास ऑफर ५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शोरूम्समध्ये उपलब्ध असेल, असे व्यवस्थापनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

सण-समारंभ असो किंवा दैनंदिन वापर, प्रत्येक प्रसंगासाठी साजेसे दागिने उपलब्ध करून देणे हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य ठरले आहे. या विशेष उपक्रमात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या हलक्या दागिन्यांपासून ते खास प्रसंगांसाठीच्या जड आणि नक्षीदार दागिन्यांपर्यंतची विस्तृत श्रेणी ग्राहकांसाठी खुली करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने उत्तम दर्जाच्या सोन्याच्या चेन, सुबक सोन्याच्या बांगड्या आणि अतिशय सुंदर अशा हिऱ्यांच्या बांगड्यांचा समावेश आहे.

## शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ साठी विधी अभ्यासक्रमाच्या सीइटी चे ऑनलाईन अर्ज सुरु




**लातूर/प्रतिनिधी:** एल एल बी (पाच वर्ष) व एल एल बी (तीन वर्ष ) विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाची एमएचटी सीईटी लॉ (MHT-CET-LAW) ही प्रवेश परीक्षा द्यावी लागते. त्यासाठी ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज करण्याची प्रक्रिया चालू झाली असून बारावीनंतर एल एल बी (पाच वर्ष) अभ्यासक्रमासाठी दि. ९ जानेवारी २०२६ ते दि. २४ जानेवारी २०२६ या कालावधीत तर पदवी नंतर एलएलबी (तीन वर्ष) अभ्यासक्रमासाठी दि. ८ जानेवारी २०२६ पासून सुरू झाली असून दिनांक २३ जानेवारी २०२६ पर्यंत ऑनलाइन प्रवेश परीक्षा अर्ज भरता येतील.

इच्छुक विद्यार्थी www.cetcell.mahacet.org या वेबसाइटला भेट देऊन ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज भरू शकतात. बारावीनंतर एल एल बी (पाच वर्ष) अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ८ मे २०२६ रोजी तर पदवी नंतर एल एल बी (तीन वर्ष ) अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा १ ते २ एप्रिल २०२६ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

बऱ्याच विद्यार्थ्यांना विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा (सीईटी) असते हे माहिती नसल्यामुळे ते प्रवेशापासून वंचित राहतात. तरी जास्तीत जास्त विदयार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा व आपले करिअर निश्चित करावे असे आवाहन दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनम नाथानी यांनी केले आहे. बारावीनंतर एल एल बी (पाच वर्ष) अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज भरताना काही अडचण येत असेल किंवा त्याविषयी काही माहिती नसेल तर महाविद्यालयाकडून मोफत फॉर्म भरून दिले जातील.

त्यासाठी ९४२००१८५६५ या भ्रमणध्वनीवर तसेच अधिक माहितीकरिता दयानंद विधी महाविद्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा अथवा www.dayanandlaw.org या वेबसाइटला भेट द्यावी.

## भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात समसापूरच्या सरपंच बरीदे, पोहरेगाव तांडा येथील माजी
# उपसरपंच राठोड यांच्यासह अनेकांचा भाजपात जाहीर प्रवेश

**लातूर/प्रतिनिधी:** आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील होणा-या विविध विकास कामांना प्रेरीत होऊन समसापूर ता. रेणापूर येथील सरपंच सौ. उज्वलाताई महादेव बरीदे आणि पोहरेगाव व पोहरेगाव तांडा ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शंकर राठोड, भिमराव राठोड यांच्यासह अनेकांनी भाजपा नेते आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर येथील संवाद कार्यालयात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, नाथसिंह देशमुख, विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, अनिल भिसे, ॲड. दशरथ सरवदे, भाजपा तालुकाध्यक्ष शरद दरेकर, रामराव मोरे, संतोष चव्हाण, विजय गंभिरे, ॲड. रमेश खाडप, श्रीमंत नागरगोजे, अशोक राठोड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या पक्ष प्रवेशामूळे पोहरेगाव जिल्हा परिषद गटात काँग्रेसला खिंडार पडले असून भाजपाची ताकद वाढली आहे.

समसापूर येथील काँग्रेसच्या सरपंच सौ. उज्वलाताई महादेव बरीदे, उपसरपंच लिंबराज चव्हाण, ग्रामपंचायत सदस्या रेखा चौधरी, छाया कलमे, सुरेखा काळे, बालाजी उपाडे यांनी आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. त्यांच्यासमवेत समसापूर येथील महादेव बरीदे, मदन चौधरी, बालाजी काळे, परमेश्वर फुलसे, शैलेश बरीदे, मनोज दत्त, बाबासाहेब इंगावले तर सुमठाणा येथील प्रविण साखरे, बिटरगाव येथील भागवत पाटील यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.




पोहरेगाव तांडा येथील माजी उपसरपंच शंकर राठोड, भिमराव राठोड, माजी ग्रामपंचायत सदस्य व्यंकट पवार यांच्यासह अशोक राठोड, सर्जेराव राठोड, भागवत आडे, कविता आडे, पांडुरंग जाधव, बालासाहेब राठोड, दत्ता राठोड, कृष्णा राठोड, संतराम पवार, शिवाजी चव्हाण, रामराव राठोड तसेच कोळगाव येथील सतिश राठोड, राहुल राठोड यांनी भाजपात प्रवेश केला.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गाव, वाडी, वस्ती व तांड्यात मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून विकास कामांना गती दिली आहे. विकास निधी काय असतो विकास कामे काय असतात हे ग्रामीण जनतेला उमजले आहे. होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन मतदार संघातील अनेक जण भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत. प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांना पक्षात सन्मानाची वागणूक दिली जाईल असे यांप्रसंगी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले. यावेळी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून भाजपात येणा-या सर्वांना योग्य सन्मान दिला जाईल असे बोलून दाखवले. येणारा काळ भाजपाचा असून कार्यकर्त्यांनी जिद्दीने कामाला लागावे.

## मतदान जनजागृती रॅलीत दयानंद विज्ञानच्या एनसीसी कॅडेट्सचा उस्फूर्त सहभाग

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी ५३ महाराष्ट्र बटालियनचे एनसीसी कॅडेट्स आणि लातूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आलेले होते.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीला मार्गस्थ केले.दयानंद महाविद्यालयापासून मार्गस्थ झालेल्या रॅलीचा समारोप टाऊन हॉल येथे झाला.या रॅलीत दयानंद विज्ञानच्या एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




या रॅलीसाठी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी यांनी उत्तम नियोजन केलेले होते.रॅलीत एनसीसी कॅडेटसनी इतर महाविद्यालयांच्या एनसीसी कॅडेटसबरोबर मतदानाचा फलक हाती घेऊन मतदान करा अशा घोषणा दिल्या.या रॅलीच्या समारोपप्रसंगी मनपा उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांनी केलेल्या मार्गदर्शनाचाही एनसीसी कॅडेट्सनी लाभ घेतला.कर्नल संतोष नौगण, कर्नल वाय.बी.सिंग आणि शिक्षणाधिकारी श्वेता नागणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या या उपक्रमामुळे व स्वीप अंतर्गत रॅलीमुळे दयानंद विज्ञानच्या एनसीसी कॅडेटसनी इतर महाविद्यालयांच्या एनसीसी कॅडेटसबरोबर शिस्तबद्ध संचलन करून लातूर शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.यावेळी सुभेदार हरिंदर सिंग,संजय चिकणे, हवालदार हिरासिंग,रवी कुमार व इतर जवानांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी दयानंद विज्ञानचे एनसीसी कॅडेटस उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# उपजिल्हा रुग्णालयाचा ठराव कळंब नगर परीषदेत बहूमताने मंजूरीस्तव निवेदन



कळंब (प्रतिनिधी)- : मागील दोन वर्षांपासून पासून मंजूर असणारे कळंब येथील उपजिल्हा रूग्णालयाचे काम प्रत्यक्षरित्या अद्यापही चालू झालेले नाही,घोडे नेमके कुठे अडले? असा सवाल जनतेतून विचारला जात असतानाच,कळंब शहर विकास कृती संघर्ष समीतीच्या वतीने पुर्वीपासून ज्या आक्रमकतेने मंजूर १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने कळंब शहरातच व्हावे या करीता प्रयत्न केला होता,त्याच धर्तीवर आता लोकसभा,विधानसभा, नगरपालिका निवडणुका संपल्यानंतर प्रशासन व लोकप्रतिनिधींना कळंब शहराच्या विकासात्मक कामाकरीता सतर्क करण्याचे काम कळंब शहर विकास कृती संघर्ष समिती करत आहे,याचाच एक भाग म्हणून जनतेच्या आरोग्याचा महत्वपूर्ण प्रश्न मार्गी लावण्याकरीता कळंब शहराच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा मा.सौ.सुनंदाताई कापसे यांसह सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांना निवेदन देत कळंब शहरातील मंजूर १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने कळंब शहरातीलच पाहणी केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकालगत असणाऱ्या जुने शासकिय रूग्णालय व जि.प.प्रशाला (मुलांची) या शाळेचा कांहीं भाग,याच ठिकाणी हे रूग्णालय व कर्मचारी निवासस्थाने करावेत अशा आशयाचे निवेदन देण्यात आले आहे,या निवेदनावर संतोष भांडे,सतपाल बनसोडे,बाळासाहेब कथले,अनिल हजारे,सचिन वाघमारे,राकेश कोमटवार,माधवसिंग राजपुत, बापु कदम आदी उपस्थित होते.

यापुर्वीही कळंब शहर विकास कृती संघर्ष समितीने केलेल्या पाठपुराव्यामुळे मा.जिल्हाधिकारी किर्तीकुमार पुजार,मा.मुख्य कार्येकारी अधिकारी (जि.प.) मा.घोष,व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.चाकुरकर यांचे संयुक्त पाहणीतून सदर जागा निश्चित करणे आली होती,तसेच सदर जागेवर मंजुर उपजिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने होणे बाबत सकारात्मक अहवालही संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत देण्यात आला आहे.

# नियोजनाचा शिल्पकार युवकाचा विश्वास आणि भाजपची ताकद म्हणजे मल्हार दादा पाटील



धाराशिव( रामेश्वर डोंगरे)- मल्हार दादा पाटील यांचे नाव घेतले की सर्वप्रथम डोळ्यासमोर येते ते म्हणजे त्यांचे अखीव, रेखीव नियोजन,ठोस भूमिका आणि कार्यकर्त्यावर असलेला आढळविश्वास! त्यांच्या नियोजनाला तोड नाही, कारण ते कागदावर नव्हे तर जमिनीवर उतरलेले नियोजन असते. मल्हार दादा पाटील यांची कामे करण्याची पद्धत अतिशय स्पष्ट आहे. एकदा एखादे काम एखाद्या कार्यकर्त्याला दिले की, त्यामध्ये पुन्हा ढवळाढवळ नाही. कार्यकर्त्यावर पूर्ण विश्वास ठेवणे हीच त्यांची खरी ताकद आहे. सर्वात आधी मतदार आणि कार्यकर्ता त्यानंतर आपण हा त्यांचा ठाम विचार आहे, आणि याच विचारामुळे ते कार्यकर्त्याच्या मनात विशेष स्थान निर्माण करतात. एखाद्या कामाचा पाठपुरावा त्यांनी एकदा हाती घेतला की, ते काम लवकरात लवकर पूर्ण कसे होईल. त्यासाठी कोणकोणते मार्ग वापरावे लागतील कोणाशी संपर्क साधावा लागेल. याचा पूर्ण अभ्यास करून ते स्वतः त्या कामाच्या मागे उभे राहतात. त्यांचे वैयक्तिक नेटवर्क अत्यंत मजबूत असून प्रशासन समाज आणि संघटना या तिन्ही पातळ्यावर त्यांचा प्रभाव दिसून येतो विशेषतः युवा कार्यकर्त्यासाठी मल्हार दादा पाटील म्हणजे प्रेरणास्थान आहेत, आज भाजपमधील युवा फळी इतकी मजबूत असण्यामागे त्यांची दूरदृष्टी आणि सातत्यपूर्ण मेहनत आहे नव्या युवकाच्या मनात भाजप म्हणजे संधी ही भावना रुजवण्याचे काम मल्हार दादांनी केली आहे.

पंचायत समिती असो वा जिल्हा परिषद निवडणूक प्रथम युवकांना संधी आणि त्यांच्या पाठीशी संपूर्ण पक्ष उभा राहील ही भूमिका मल्हार दादा पाटील स्वतः पुढाकार घेऊन मांडतात, त्यामुळे ज्या-ज्या भागात त्यांनी पक्षासाठी काम केले त्या त्या ठिकाणी भाजपची बांधणी अधिक कणखर संघटित आणि मजबूत झाल्याचे स्पष्टपणे दिसते.

. आज युवकाच्या मनाच्या केंद्रस्थानी जर एकच नाव असेल तर ते म्हणजे मल्हार दादा पाटील नियोजन नेतृत्व विश्वास आणि कार्यकर्त्याची ताकद याची उत्तम समीकरण म्हणजेच मल्हार दादा पाटील असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध होते

# कळंब पोलिसांचा 'रोड रोमिओं'वर कहर

## छेडछाड करणाऱ्यांची खैर नाही' - पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांचा थेट इशारा

कळंब -कळंब शहरात महिलांच्या सुरक्षिततेशी खेळ करणाऱ्या टवाळखोरांसाठी आता पोलिसांचा चाबूक सज्ज झाला आहे. शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी छेडछाड करणाऱ्या तथाकथित 'रोड रोमिओं'वर कळंब पोलिसांनी निर्दय कारवाईचा सपाटा सुरू केला असून, पोलीस निरीक्षक अजित चिंतले ॲक्शन मोडवर आले आहेत.

शहरातील मुख्य रस्ते, शैक्षणिक परिसर व वर्दळीच्या ठिकाणी बिनधास्त फिरणाऱ्या टवाळखोरांनी महिलांना त्रास देण्याचे प्रकार वाढवले होते. या गंभीर परिस्थितीची दखल घेत कळंब पोलिसांनी साध्या वेशातील पथके रस्त्यावर उतरवत रोड रोमिओंची थेट धरपकड सुरू केली आहे.

**कडक कारवाईचे स्वरूप :**

शाळा-महाविद्यालय परिसरात करडी नजर आणि सातत्यपूर्ण गस्त

महिलांची छेड काढणाऱ्यांना ताब्यात घेऊन कायद्याचा धडा

विनापरवाना, वेगवान व कर्कश हॉर्न वाजवणाऱ्या दुचाकींवर थेट दंडात्मक कारवाई

संशयित तरुणांची रस्त्यावरच चौकशी आणि समज

**'छेडछाड खपवून घेतली जाणार नाही' - पोलीस निरीक्षक अजित चिंतले**

कळंब शहरातील महिला आणि मुलींच्या सुरक्षेशी तडजोड करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. छेडछाडीचा प्रकार घडल्यास नागरिकांनी भीती न बाळगता थेट पोलिसांशी संपर्क साधावा, असा खणखणीत इशारा पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांनी दिला.

**टवाळखोरांचे धाबे दणाणले**

पोलिसांच्या या आक्रमक भूमिकेमुळे शहरातील टवाळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पालक व महिलांकडून पोलिसांच्या कारवाईचे जाहीर स्वागत केले जात आहे.

'रोड रोमिओमुक्त कळंब' हे ध्येय ठेवून ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# उमरगा येथून मोटारसायकलची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी संजय वसंतराव सुरवसे, महादेव गल्ली उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांची मोटरसायकल संजय सुरवसे यांचे घरासमोरुन चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संजय सुरवसे यांनी दि.०९.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा सुनंदाताई कापसे यांचा कर्मचाऱ्यांना कडक इशारा; नागरिक सेवा व स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य

कळंब : नगर परिषद कळंबच्या नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. सुनंदाताई शिवाजी कापसे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच आढावा बैठकीत नगर परिषद प्रशासनाला स्पष्ट आणि ठोस दिशा दिली आहे. नागरिक सेवा, शहर स्वच्छता आणि वेळेत कामे या बाबींमध्ये कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

नगर परिषद कार्यालयात मुख्याधिकारी श्रीमती मंजुषा गुरमे यांच्या उपस्थितीत सर्व विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांची सविस्तर आढावा बैठक पार पडली. बैठकीदरम्यान कर्मचाऱ्यांना काम करताना येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या तसेच त्या तातडीने सोडवण्याचे निर्दे श देण्यात आले.

शहराच्या स्वच्छतेमध्ये आरोग्य विभाग व सफाई कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करत, सर्व प्रभागांमध्ये नियमित स्वच्छता, नाल्यांची वेळेवर साफसफाई आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे स्पष्ट आदेश अध्यक्षा कापसे यांनी दिले. घंटागाडी कर्मचाऱ्यांनी प्रत्येक प्रभागातून वेळेत कचरा संकलन करावे, नागरिकांना स्वच्छतेबाबत कोणतीही अडचण येऊ देऊ नये, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

नगर परिषद म्हणजे नागरिकांसाठी सेवा केंद्र आहे. नागरिकांच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य दिले गेले पाहिजे. हलगर्जीपणा, दिरंगाई किंवा दुर्लक्ष याला यापुढे थारा दिला जाणार नाही, असा ठाम सूर अध्यक्षा कापसे यांनी व्यक्त केला.

मुख्याधिकारी श्रीमती मंजुषा गुरमे यांनीही सर्व विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांना नागरिकांना वेळेत, पारदर्शक व दर्जेदार सेवा देण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी नगर परिषदेच्या वतीने शहरवासीयांना आवाहन करण्यात आले की, घरगुती व व्यावसायिक ठिकाणी निर्माण होणाऱ्या ओल्या व सुका कचऱ्याचे विलगीकरण करून दारात येणाऱ्या घंटागाडीतच कचरा टाकावा, जेणेकरून शहर स्वच्छ व सुंदर राहील.

या बैठकीस कार्यालयीन अधीक्षक श्री. एल. एस. वाघमारे, आरोग्य विभाग प्रमुख श्री. संजय हजगुडे, आस्थापना, बांधकाम, पाणीपुरवठा, भांडार, वसुली, नगर रचना, विद्युत तसेच सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# १२ जानेवारी रोजी धाराशिव येथे एकदिवसीय कार्यशाळा

## एमएसएमई,निर्यात व उद्योजकांसाठी एकाच व्यासपीठावर मार्गदर्शन

धाराशिव, (जिमाका)- 'इग्नाईट कन्व्हेंशन-२०२६' अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा सोमवारी, १२ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येत आहे.राज्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे,राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे,एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम तसेच निर्यातवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांमार्फत अनेक योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या सर्व योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध व्हावी,या उद्देशाने संबंधित सर्व विभागांच्या सहकार्याने 'इग्नाईट कन्व्हेंशन-२०२६' अंतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा सोमवारी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,सेंट्रल बिल्डिंगजवळ,धाराशिव येथे होणार आहे.

या कार्यशाळेसाठी सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योग घटक,निर्यातदार,निर्यातक्षम उद्योजक,नवउद्योजक,औद्योगिक संस्था व संघटना,औद्योगिक समूह,औद्योगिक वसाहती,शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक,प्रक्रिया उद्योग केंद्रे,तसेच राज्य शासन व संबंधित उपक्रमांचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यातविषयक कामकाज करणारे घटक, संशोधक व बँक प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

कार्यशाळेत पुणे येथील डीजीएफटीचे महासंचालक,अपेडा पुणे,एमएसएमईचे सहायक संचालक,मैत्री कक्षाचे अधिकारी,इंडियन पोस्टचे अधिकारी, अधीक्षकीय कृषी अधिकारी,एसबीआयचे निर्यात वित्तपुरवठा व्यवस्थापक आदी तज्ज्ञांकडून निर्यात,उद्योगविकास व शासकीय योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# पहिल्या 'खेलो इंडिया ट्रायबल गेम्स' साठी १३ जानेवारीला राज्यस्तरीय निवड चाचणी

## अनुसूचित जमातीतील खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका) पहिल्या 'खेलो इंडिया ट्रायबल गेम्स-२०२५-२६' चे आयोजन छत्तीसगढ राज्यामध्ये करण्यात येणार आहे.या स्पर्धेमध्ये फुटबॉल, हॉकी,आर्चरी,ॲथलेटिक्स, जलतरण,वेटलिफ्टींग व कुस्ती या खेळांचा समावेश असून ही स्पर्धा खुल्या वयोगटात आयोजित करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार वरील खेळप्रकारांच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय निवड चाचणीतून राष्ट्रीय निवड चाचणीसाठी खेळाडू अथवा संघाची निवड करण्यात येईल. त्यानंतर राष्ट्रीय निवड चाचणी व स्पर्धेमधून 'खेलो इंडिया ट्रायबल गेम्स-२०२५-२६' साठी खेळाडू व संघ पात्र ठरणार आहेत.

या राज्यस्तरीय निवड चाचणी अंतर्गत आर्चरी,कुस्ती व वेटलिफ्टींग हे खेळ जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन गेट,अमरावती येथे; हॉकी - यश केडमी, सोनाई, ता. नेवासा,जि. अहिल्यानगर येथे; ॲथलेटिक्स - पोलिस ग्राउंड,पालघर येथे; जलतरण - श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी,पुणे येथे; तर फुटबॉल - विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर कोराडी,नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहेत.या सर्व खेळांच्या राज्यस्तरीय निवड चाचण्या दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी होतील व खेळाडूंनी दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपस्थित राहणे आवश्यक आहे. या निवड चाचणीसाठी उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंनी अनुसूचित जमाती (Scheduled Tribe) प्रवर्गातील जात प्रमाणपत्र,महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल),मूळ आधार कार्ड तसेच संबंधित खेळासाठी आवश्यक साहित्य व संरक्षक साहित्य सोबत आणणे अनिवार्य आहे.वैयक्तिक खेळप्रकारात आर्चरीमध्ये प्रत्येक बाबीसाठी गुणानुक्रमे प्रथम आलेले तीन खेळाडू, तसेच ॲथलेटिक्स, जलतरण,कुस्ती व वेटलिफ्टींग या खेळप्रकारांत गुणानुक्रमे प्रथम आलेले दोन खेळाडू राष्ट्रीय निवड चाचणीसाठी पात्र ठरणार आहेत.

सर्व खेळाडूंनी या निवड चाचणीत स्वतःच्या खर्चाने व स्वतःच्या जोखीम व जबाबदारीवर सहभागी व्हावे.मात्र खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था कार्यालयामार्फत करण्यात येईल. सहभागी खेळाडूंना कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

राज्यस्तरीय निवड चाचणीत सहभागी होणाऱ्या खुल्या वयोगटातील खेळाडूंनी १२ जानेवारी २०२६ पूर्वी संपर्क प्रमुखांशी संपर्क साधून आपल्या नावांची नोंद करणे अनिवार्य आहे.आर्चरी,कुस्ती व वेटलिफ्टींगसाठी श्री.स्वप्निल चांदेकर (९४०४३७९६७७), हॉकीसाठी श्री. विशालगर्जे (८३६९५३९०७७), ॲथलेटिक्ससाठी श्री.अमृत घाडगे (९८७००४८६४९), जलतरणसाठी श्री.बालाजी केंद्रे (९५०३५४८९८८) व फुटबॉलसाठी श्री.अनिल बोरावार (९४२२१५९०८३) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

जिल्ह्यातील अधिकाधिक अनुसूचित जमातीतील खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# धाराशिव येथून अज्ञाताने पळवली मोटारसायकल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत सुरेश मारुती देवकते, वय ५७ वर्षे, रा.देवकते गल्ली वैराग रोड धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची हिरो कंपनीची मोटरसायकल ही दि. ०६.०१.२०२६ रोजी १८.०० तुळजापूर ते धाराशिव शहराकडे येणारे रोडवर आयुर्वेदिक कॉलेजच्या बाजूच्या हॉटेलजवळ धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुरेश देवकते यांनी दि.०९.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649